AG5461

# २५. ढोल



सातपुड्याच्या परिसरातील कंदमुळे, फळे, पानाफुलांनी बहरलेले घनदाट जंगल. त्या जंगलात आदिवासी लोक राहायचे. निसर्गाच्या सान्निध्यात राहून, निसर्गाचे नियम पाळून आदिवासी आपले जीवन जगत होते. अशा या आदिवासींच्या होळीला सुमारे आठशे वर्षांचा इतिहास आहे.

सातपुडा डोंगराच्या परिसरातील होळी महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर प्रसिद्ध आहे. होलिकोत्सवाची सुरुवात माघ पौर्णिमेला दांडापूजनाने होते. आदिवासींच्या संस्कृतीत परंपरेने आलेल्या दांडापूजनाला विशेष महत्त्व आहे.

होळी पौर्णिमेला दांडापूजन झाले, की सातपुड्यातील वाड्यापाड्यांतून ढोलांचा आवाज घुमू लागतो. कुडाच्या घरांच्या सांदीकोपऱ्यांत, खुंटीला, आढ्याला बांधून ठेवलेले ढोल बाहेर निघू लागतात. मुख्य होळीच्या पंधरा दिवस अगोदर लहान मुलांची होळी सुरू होते. लहान मुले छोटी होळी पेटवून तिच्याभोवती फेर धरून नाचतात. मुले होळीनृत्याचा सराव करतात आणि त्याच दिवसापासून ढोलांचा आवाज साऱ्या गावात, आसमंतात घुमू लागतो.

अख्ख्या सातपुड्यात ढोलांवर थाप पडू लागते. फाल्गुन पौर्णिमेच्या होळीची जय्यत तयारी चालू होते. पोटापाण्यासाठी गाव सोडून गेलेले मजूर या सणासाठी हळूहळू गावाकडे येतात.

आमच्या गावातील आमश्या डोहल्या आपल्या चिल्यापिल्यांना घेऊन सणासाठी गावात यायचा. अख्ख्या सातपुड्यात आमश्या डोहल्या प्रसिद्ध होता. आमश्या ढोल वाजवू लागला, की वाड्या-पाड्यांवरची माणसे ढोलाच्या दिशेने नाचत नाचत येत असत. न थकता रात्र-रात्र ढोल वाजवण्यात आमश्या पटाईत होता.

ढोलाचा सांगाडा आंब्याच्या किंवा सागाच्या लाकडापासून तयार केलेला असतो. त्यावर कातडी चढवतात. कुणी ढोलाची पाने बसवतात. कुणी दोऱ्या आवळतात. ढोलासाठी लाकूड कोणते वापरायचे? तो तासायचा कसा? त्याला कोणत्या प्राण्याच्या कातड्याचे पान लावायचे? तो आवळायचा कसा? ढोलाचा नाद अख्ख्या सातपुड्यात घुमवायचा कसा? ही सगळी माहिती आमश्या डोहल्याला होती. जणूकाही या निसर्गाने त्याला ढोल बनवण्यासाठीच जन्माला घातले होते, म्हणून अख्खा सातपुडाच त्याला 'आमश्या डोहला' म्हणत होता.

होळीचा दिवस जवळ आला तसतसे पाड्यांवरचे ढोल डोंगरदऱ्यांत आणि साऱ्या आसमंतात घुमू लागले. आमश्याची ढोलावरची थाप मजबूत झाली. 'यंदाच्या होळीत खूप ढोल वाजवू. अख्खा सातपुडा दणाणून सोडू', अशी जणू त्याने शपथ घेतली होती.

होळीचा दिवस उजाडला. आमश्या सकाळपासूनच होळीजवळ ढोल घेऊन बसला होता. हळूहळू त्याने

**शिक्षकांसाठी :** १. इंटरनेटचा (आंतरजाल) वापर करून आदिवासी जीवनाविषयीची माहिती मिळवावी. विद्यार्थ्यांना वाचनासाठी द्यावी.

ढोलावर थाप मारायला सुरुवात केली. गावातील स्त्री–पुरुष, पोरेबाळे ढोलाच्या दिशेने येऊ लागली. नकळत नाचाला सुरुवात झाली. सर्वजण एकमेकांचा हात धरून बेधुंदपणे नाचत होते. आमश्या मोठ्या रंगात येऊन ढोल वाजवत होता. बघता बघता लहान–सहान, थोरामोठ्यांनीही आमश्याच्या भोवती रिंगण धरले. नाचाच्या चाली बदलत, तहानभूक विसरून सर्वजण ढोलाभोवती नाचू लागले. नाच रंगात येता येता रात्र केव्हा झाली ते समजलेही नाही. पेटत्या होळीच्या भोवती पुन्हा नाच सुरू झाला. ढोलाचा वेग वाढला तसे नाचणारेही बेधुंद झाले आणि होळी जसजशी विझू लागली तसतसा ढोलाचा वेगही मंदावू लागला. आमश्याची ढोलावरची थाप एकदम मंदावली, तसा नाच एकदम थांबला. कधीही न थांबणारा आमश्याचा हात कसा काय थांबला, म्हणून सर्वजण त्याच्याकडे पाहू लागले आणि एकदम आरडाओरड झाली. आमश्या डोहला ढोलाला सावरत धरतीवर कोसळला होता! ढोलाच्या नादाबरोबर आमश्याचा श्वास अचानक बंद झाला.

रानावनांतील पानाफुलांनी, पळसफुलांनी आमश्याची डोली सजू लागली. सजवलेल्या डोलीत आमश्या निवांत झोपला होता; पण त्याच्या ढोलाच्या आवाजाचे प्रतिध्वनी सातपुड्याच्या रांगारांगांतून घुमत होते. अख्खा गाव डोलीभोवती दुःख गिळत बसला होता.

जंगल्या भगत डोलीजवळ आला. त्याने कथा लावली. ''आपण या निसर्गातील एक जीव. प्रत्येकाला जन्म आणि मरण निसर्गच देतो. झाड जन्माला येते आणि एक दिवस मरते, म्हणून इतर झाडे दुःख करत बसत नाहीत. निसर्गचक्र थांबत नाही. प्राणी–पक्ष्यांचेही तसेच. माणूस निसर्गातला एक क्षुल्लक जीव.''

जंगल्या भगत पुढे बोलू लागला, ''आमश्या जन्माला आला होता तर त्याला मरण अटळ. आता उद्या त्याला सागाच्या झाडाखाली खोल खड्ड्यात गाडले जाईल. त्याचा देह मातीचा, त्याची मातीच होईल. तिथेच एखादी सागाची बी त्या मातीत रुजेल. त्याचं झाड होईल – मोठं सागाचं झाड – त्याचा कुणीतरी ढोल बनवेल. तो ढोल पुन्हा वाजू लागेल. ढोलाच्या रूपाने आमश्या आपल्यातच राहील. डोंगरदऱ्यांतून नाद, लय आणि स्वर घुमू लागतील. आमश्याचा ढोल पुन्हा वाजू लागेल.''

सकाळ झाली होती व सूर्यनेही आमश्याचे अखेरचे दर्शन घेतले होते.

**– संजय लोहकरे**

**शब्दार्थ :** **दांडापूजन** – होळीच्या सणाला दांडा पुरतात व त्याची पूजा करतात. **आसमंतात** – सभोवताली, चोहोबाजूंना. **बेधुंदपणे** – भान हरपून.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आदिवासींच्या होळीला किती वर्षांचा इतिहास आहे?

(आ) अख्ख्या सातपुड्यात ढोल वाजवण्यात कोण प्रसिद्ध होता?

(इ) 'आमश्या डोहल्या' ने कोणती शपथ घेतली होती?

**प्र. २. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सातपुड्याच्या परिसरातील निसर्गाचे वर्णन करा.

(आ) आमश्याच्या ढोल वाजवण्याचे वैशिष्ट्य काय होते?

(इ) ढोल कसा तयार करतात?

(ई) 'ढोलाच्या रूपाने आमश्या आपल्यातच राहील,' हे पटवून देण्यासाठी भगताने काय सांगितले?

**प्र. ३. वाक्यात उपयोग करा.**

आसमंतात घुमणे, पटाईत असणे, दणाणून सोडणे, शपथ घेणे, रिंगण धरणे.

**प्र. ४. तुम्ही 'होळी' हा सण कसा साजरा करता, त्याचे वर्णन करा.**

**प्र. ५. लोकसाहित्यातील 'होळी' या सणासंबंधीच्या कविता शिक्षकांच्या मदतीने मिळवा. गाऊन दाखवा.**



आदिवासींचे होळी नृत्य

## आपण समजून घेऊया.

### काळ

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) इरफान वेगाने धावतो.

(२) इरफान वेगाने धावला.

(३) इरफान वेगाने धावेल.

पहिल्या वाक्यात इरफान धावतो, म्हणजे क्रिया आता घडत आहे; म्हणून हे वाक्य वर्तमानकाळातील आहे.

दुसऱ्या वाक्यात इरफानची धावण्याची क्रिया होऊन गेली आहे, म्हणजे क्रिया पूर्वी घडली आहे; म्हणून हे वाक्य भूतकाळातील आहे.

तिसऱ्या वाक्यात इरफान धावणार आहे, म्हणजे अजून धावण्याची क्रिया झालेली नाही. क्रिया पुढे घडणार आहे, म्हणून हे वाक्य भविष्यकाळातील आहे.

क्रियापदाच्या रूपावरून वाक्यातील काळ ओळखता येतो. वाक्यातील क्रियापद काळानुरूप वापरलेले असते. वर्तमाकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ हे काळाचे मुख्य तीन प्रकार आहेत.

### वर्तमानकाळ

- **खालील परिच्छेद वाचा.**

रोज सकाळी हत्तीचा कळप नदीवर येतो. काही हत्ती थोडा वेळ नदीकिनाऱ्यावर फिरतात. किनाऱ्यावरच्या मातीत, वाळूत खेळतात; तर काही हत्ती नदीच्या पाण्यात जातात. सोंडेत पाणी भरून एकमेकांच्या अंगावर उडवतात. हत्ती बराचसा वेळ नदीवर घालवतात. नंतर जंगलाच्या दिशेने चालू लागतात.

अधोरेखित केलेले शब्द वाक्यातील क्रियापदे आहेत. या क्रियापदांनी हत्ती रोज सकाळी काय करतात, कोठे जातात, तेथे काय करतात हे आपल्याला समजते. क्रियापदांवरून क्रिया नेहमी होते, आताही होते हे जाणवते. ज्या क्रिया सातत्याने केल्या जातात, त्यांची क्रियापदे वर्तमानकाळी असतात. तसेच जी सत्ये बदलत नाहीत ती दर्शवतानाही वर्तमानकाळी क्रियापदे योजतात.

**उदा.,** (१) सूर्य पूर्व दिशेला उगवतो.

(२) सूर्य पश्चिमेला मावळतो.